××××× प्रकरण पाचवे ×××××

××××× पंचवार्तिकाने मराठी साहित्यात घातलेली भर - "विशेष" ×××××

## प्रकरण पाचवे

## पंचवार्तिकाने मराठी साहित्यात घातलेली भर - "विशेष"

### प्राचीन मराठीचा संपन्न इतिहास :-

प्राचीन मराठी वाङ्मयाच्या इतिहासात सर्वश्रेष्ठ ऐश्वर्यकाल म्हणून यादवकाळाला महत्त्व दिले जाते· यादवकाल हा मराठी वाङ्मयाचा आदिकाल होय·[१] मात्र मराठी वाङ्मयाचे यादवकाळातील एवढे ऐश्वर्य एकाएकी निर्माण झालेले नाही तर यादवकाळापूर्वीही मराठी भाषेत साहित्य लिहिले जात होते· तेराव्या शतकात मराठी साहित्याला उज्ज्वल काळ प्राप्त झाला हे खरे असले तरी साहित्यातील ही प्रौढता आणि प्रगल्भता अचानक आलेली नाही·

अकराव्या बाराव्या शतकात मराठी भाषेत गद्य व पद्य असे दोन्ही प्रकारचे वाङ्मय निर्माण होऊ लागले होते, लहान मुलांना वाचण्याकरिता नीतिकथा व स्त्रीयांकरिता गाणी या काळात लिहिली जात होती· सामान्य लोकांसाठी पौराणिक कथानके तर साधारण बुध्दीच्या ब्राह्मणांकरिता ज्योतिष व वैद्यकशास्त्रासंबंधी सुलभ रचना लिहिल्या जात होत्या· या शिवाय धर्मसंस्थापकांची चरित्रे व आख्यायिका तसेच राजे-महाराजे अशा लोकांसाठी पुराणकथा लिहिल्या जात असत· तेराव्या शतकापूर्वीच्या मराठी वाङ्मयाचे स्वरूप स्थूलमानाने याप्रकारचे होते·[२]

### महानुभावांनी जनभाषेचा केलेला स्वीकार :-

तेराव्या शतकात महानुभाव संप्रदायातील साहित्यिकांनी मराठी भाषेचे वाङ्मय समृध्द केले· मराठी गद्याची परंपरा महानुभाव गद्यपरंपरेपूर्वीची असली तरी तिचे स्वरूप मात्र फारसे विकसित नव्हते· यादवराजांच्या दरबारी मराठी भाषेविषयी आस्था होती आणि महानुभावीय साहित्यिकांना या देशी भाषेचा अभिमान होता· त्यामुळे तिला धर्मभाषेचा दर्जा प्राप्त होऊन तिच्यात विपूल वाङ्मयनिर्मिती झाली· वचनरूप ईश्वराची पूजा बांधण्याच्या

उद्देशाने व प्रेरणेने मराठी गद्यवाड्मयात विविध प्रकार लिहिले गेले·

**विविध वाड्मयप्रकारांची निर्मिती :-**

पंथप्रचाराच्या उद्देशाने वाड्मयनिर्मिती करताना वाड्मयात गद्याची ललित व ललितेतर अशी पायाभरणी महानुभावीय गद्यलेखकांनी केली·[१] वाड्मयनिर्मिती करणे हा उद्देश नसला तरी या पंथाच्या साहित्याला वाड्मयीन दर्जा प्राप्त झाला· यात भाषाशास्त्र साहित्यशास्त्र व व्याकरण अशी शास्त्रीय गद्यनिर्मिती झाली· कवीश्वर व्यास, पं·आनेराज व्यास आणि पं·भीष्माचार्य यांनी मराठी भाषेचे व्याकरण लिहिण्याचा प्रयत्न केला·

**मराठी व्याकरणाचे मूळ महानुभावी वाड्मयात :-**

भाषा स्थीर होऊ लागली की, तिला काही नियमांची आवश्यकता भासू लागते· कारण एकाच भाषेत अनेक बोलीभाषेतून बोलणारे लोक असतात· त्यांचे बोलणे कोणते शुध्द व कोणते अशुध्द हे ठरविण्यासाठी काही नियमांची जरूरी भासते. शिवाय सतत बदलत राहणे हा भाषेचा नियम आहे· म्हणून व्यवहारात वापरली जाणारी स्थीर भाषा एका समान पातळीवरून दूर जाऊ नये यासाठी तिला नियंत्रित करण्याची आवश्यकता निर्माण होते· हे काम त्या भाषेचे काही सर्वसामान्य नियम निश्चित केले की सुकर होते· शिवाय बोलताना व्यक्तीच्या बोलण्याची भावना अगर तीव्रता ऐकणारास जाणवते· तोंडी बोलताना हे समजते पण भाषा लिपीबध्द झाल्यावर लिखित स्वरूपातील या भावना कळण्यासाठी काही नियमांची आवश्यकता भासते· असे भाषेचे शिष्टसंमत स्वरूप निश्चित करणारे नियम म्हणजेच त्या भाषेचे व्याकरण होय· भाषेतील शब्दांचे विविध प्रत्यय, विकार व रचनाविषयक संकेत शोधून काढून ते संगतवार मांडून त्याचे स्वरूप निश्चित करणे हेच व्याकरणाचे खरे कार्य आहे·

आजच्या शास्त्रीय मराठी व्याकरणाचे विकसित स्वरूप एकाकी निर्माण झालेले नाही· तर मराठी व्याकरणाची ही परंपरा थेट महानुभाव साहित्यापर्यंत जाऊन पोहोचते· कवीश्वर व्यास आणि आनेराज व्यास यांनी मराठीचे व्याकरण लिहिण्याचा प्रयत्न केला असला तरी त्यांची व्याकरणे व्याकरणाच्या एका विशिष्ट अंगाचा विचार करणारी होती· पं·भीष्माचार्याने "पंचवार्तिक" लिहून तत्कालीन मराठी भाषेचे पूर्वीच्या व्याकरणग्रंथाच्या मानाने विस्तृत व्याकरण तयार करण्याचा प्रयत्न केला··

महानुभाव पंथाने मराठी गद्याची परंपरा तेराव्या शतकापासून जिवंत ठेवली, प्रतिष्ठितपणे तिची जोपासना केली, ती समृध्द केली ही वस्तुस्थिती आहे.[१] या साहित्यात काव्याबरोबरच चरित्र, स्फूटगद्य, व्याकरण, भाषाशास्त्र, भाष्य, साहित्यशास्त्र, तत्वज्ञान इ.वाङ्मयप्रकारही त्यांनी हाताळले. भाषा अर्थपूर्ण होण्यासाठी शब्दांना लागणारे प्रत्यय, त्यांचे विकार, विशिष्ट प्रकारे रचना व क्रमबध्दता या बाबींचे ज्ञान असणे आवश्यक असते. बोलतानाचे भाषेतील चढउतार व लकबी लिखाणात दाखवाव्या लागतात. प्रत्येक भाषेला एक विशिष्ट घाट असतो आणि विरामचिन्हांच्या साहयांनी तो स्पष्ट करावा लागतो. गद्यलेखनात या सर्व बाबी लक्षात ठेवाव्या लागतात. आणि त्या सर्व बाबींचे ज्ञान करून घेण्यासाठी व्याकरणाचे ज्ञान असणे आवश्यक ठरते.

**"पंचवार्तिक" : मराठी वाङ्मयाला लाभलेले वरदान :-**

तेराव्या शतकापूर्वी व्याकरणाची ही अडचण लेखकांना जाणवली असावी. ती सोडविण्यासाठी व्याकरण लिहिण्याचे तसे काही प्रयत्न झाले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र हे प्रयत्न अज्ञात राहिल्याने महानुभावीय गद्यलेखकांना व्याकरणाची जरूरी भासली असावी. तसेच हे गद्यलेखन पंथप्रचाराच्या उद्देशाने होत असल्याने सर्वसामान्यांना समजण्याइतपत ते सुलभ व अर्थवाही असावे. यासाठी व तत्कालीन मराठी भाषा लोकांना शिकता यावी म्हणून महानुभावीय साहित्यिकांना व्याकरणाची आवश्यकता निर्माण झाली. "पंचवार्तिका"ची निर्मिती त्याचाच परिपाक म्हणता येईल. पं.भीष्माचार्यांच्या या व्याकरणाच्या रूपाने वाङ्मय लेखनातील व वाङ्मयआकलनातील काही अडचणी दूर झाल्या असल्या पाहिजेत. मराठी वाङ्मयाच्या विकासाला पंचवार्तिकाच्या रूपात एक वरदानच मिळाले. एवढेच नाही तर पुढे मराठी भाषेत नवीन व्याकरणग्रंथ निर्माण होईपर्यंतच्या मधल्या काळात गद्यलेखकांना या व्याकरणग्रंथाचा उपयोग झाला असणार. तसेच नंतरच्या व्याकरणकारांना मार्गदर्शक म्हणून पंचवार्तिकाचा उपयोग झाला असणे स्वाभाविक आहे.

पंथनिष्ठेमुळे पंथप्रसाराचा ध्यास होता आणि पंथप्रसार होण्यासाठी पंथाचे तत्वज्ञान मराठी या प्रादेशिक भाषेत असणे आवश्यक होते. ही मराठी भाषा सर्वांना शिकता यावी यासाठी तिचे व्याकरण असण्याची गरज निर्माण झाली. या प्रेरणेनेच व्याकरण लिहिण्याचा प्रयत्न केला गेला. सूत्रपाठातील सूत्रांच्या भाषेची पध्दती कळून त्यायोगे सूत्राचा अर्थ अधिक स्पष्ट होण्याच्या उद्देशाने पं.भीष्माचार्यांनी "पंचवार्तिक" या व्याकरणग्रंथाची

उभारणी केली.[५]

पं.भीष्माचार्य हे यादवांच्या दरबारी होते. त्यामुळे यादवकालीन मराठी भाषेची वैशिष्टये पंचवार्तिकात दिसून येतात. पंडिती वळणाची यादवकालीन भाषा पंचवार्तिकात आली आहे. महानुभाव पंथीयंना मराठी भाषेचा सार्थ अभिमान होता. त्यामुळे त्यांच्या वाङ्मयासोबत मराठी ही सावलीसारखी उभी आहे. पंचवार्तिकात भीष्माचार्यांनी केलेले निरूपण प्रामुख्याने व्याख्यास्वरूपी आहे. "सा वचनांचे सूत्र ते वाक्य बोलिजे", "तीनि पदांचे सूत्र ते वचन बोलिजे" अशा अल्पाक्षरी व सुटसुटीत व्याख्या करून लेखकांनी विवेचनात नेमकेपणा व सुलभता आणली आहे.

**महानुभावीय मराठी गद्य संस्कृत प्रवृत्तीचे -**

मराठी भाषेतील महानुभाव साहित्यलेखन होण्याआधीचे वाङ्मय प्रामुख्याने संस्कृत भाषेत असल्यामुळे त्या भाषेचा प्रभाव महानुभाव साहित्यावर असणे साहजिक आहे. संस्कृतमधील पाणिनीय व्याकरणशास्त्राच्या रचनेचा प्रभाव "पंचवार्तिकावर" असल्याचे सांगितले जाते.[६] पंचवार्तिक ग्रंथाची सुरूवातच भीष्माचार्यांनी एका संस्कृत श्लोकाने केली आहे.-

"सूत्रलक्षणमेवंच सूत्रप्रकृतिलक्षणम् ।
सूत्रकारकमेवंच सूत्रव्याख्यानलक्षमणम् ।।
सूत्रस्वरूपमेवंच कथितं शास्त्रवेदिभिः ।
पंचवार्तिकमेतद्यः पठेत्स पण्डितो भवेत् ।।"

या प्रतिज्ञेवरून संस्कृत भाषेचे महनीयत्व किती गाढ होते याची प्रचिती येते.[७] पंचवार्तिक ग्रंथातील अष्ट, अष्टदश, व्दादश, चतुष्प्रयोगी, एवमादि, षटपदी असे शब्द या ग्रंथावरील संस्कृतच्या प्रभावाचीच साक्ष देतात.

सूत्रलक्षणाचा विचार करताना पंचवार्तिकात वचनाचे एकवचन, व्दिवचन, व बहुवचन असे तीन प्रकार सांगितले आहेत. आजच्या मराठी व्याकरणात एकवचन आणि बहुवचन किंवा अनेकवचन अशी दोनच वचने मानली जातात. व्दिवचन मानले जात नाही. मात्र एकवचन व अनेकवचन ही पंचवार्तिकात सांगितल्याप्रमाणेच मानली जातात. पुल्लिंग, स्त्रीलिंग व नपुसकलिंग हे पंचवार्तिकात सांगितलेले लिंगाचे तीन भेद सध्याच्या मराठी व्याकरणात पूर्वीप्रमाणेच मानले जातात.

**पंचवार्तिकातील तीन पुरूष :-**

पंचवार्तिकात प्रथमपुरूष, मध्यमपुरूष व उत्तमपुरूष असे तीन पुरूष सांगितले आहेत· उदा·"तो जातो" हा प्रथमपुरूष, "तू जात असि :" हा मध्यमपुरूष तर "मी जातो" हा उत्तम पुरूष मानला आहे· आजही मराठी व्याकरणात हे तीन पुरूष मानलेले आहेत· मात्र ज्या प्रकारच्या वाक्यांना वरील नावे पंचवार्तिकात दिलेली आहेत तशी नावे तशाच स्वरूपाच्या वाक्याला दिली जात नाहीत· शिवाय नावातही थोडा फरक आहे· पंचवार्तिकातील उत्तम पुरूष आज प्रथम पुरूष म्हटला व मानला जातो· ﴾उदा·मी जातो·﴿ मध्यमपुरूषाला आज व्दितीयपुरूष म्हटले जाते· ﴾उदा·तू जातोस·﴿ तर प्रथमपुरूषी वाक्याला आज तृतीय पुरूषी मानले जाते· ﴾उदा·तो जातो·﴿

**पंचवार्तिकातील समास व संधी विचार :-**

सूत्रलक्षण सांगताना भीष्माचार्यांनी समास आणि संधीविषयी विवेचन केले आहे· बदलत्या समाजाबरोबर भाषादेखील बदलत राहते· साध्या-सरळ शब्दांनी बोलणे अपुरे वाटू लागते व नवीन शब्दांच्या गरजेपोटी सामासिक शब्द तयार होतात· भीष्माचार्यांनी समासाचे अव्ययीभाव, तत्पुरूष, व्दंव्द, आणि बहुव्रीही असे चार प्रमुख प्रकार सांगितले आहेत· तसेच तत्पुरूषाचे विभक्ती तत्पुरूष, कर्मधारय व व्दिगु असे तीन उपप्रकार सांगितले आहेत· सध्या मराठी व्याकरणात समासाचे हे चार प्रकार व्याख्या व स्वरूपदृष्टया असेच मानले जातात· मात्र व्दंव्द आणि बहुव्रीही या समासाचे आज मानले जाणारे उपप्रकार पंचवार्तिकात सांगितलेले नाहीत· पंचवार्तिक ग्रंथात स्वरसंधी, व्यंजनसंधी आणि विसर्गसंधी या तीन संधी मानल्या आहेत· त्यांची उदाहरणे आलेली आहेत· मात्र संधीची तशी स्पष्ट नांवे व स्पष्टीकरण पंचवार्तिकात नाही· याच तीन संधी आजही मानल्या जातात·

**पंचवार्तिकातील वाक्यविचार :-**

वाक्यविचार करताना वाक्याचे वाक्यातील पदसंख्येनुसार पंधरा भेद भीष्माचार्यांनी केले आहेत· असे भेद करण्याची पध्दत आजच्या व्याकरणात नाही· वाक्यरचनेच्या दृष्टीने वाक्याचे केवल वाक्य व संयुक्त वाक्य असे दोन प्रकार भीष्माचार्यांनी केले आहेत· त्यांच्या स्वतंत्र व्याख्याही त्यांनी दिल्या आहेत· संयुक्त वाक्याचे वचनवत्प्रयोग, वाक्यवतप्रयोग व वचनवाक्यवत्प्रयोग असे तीन प्रकारे वर्गीकरण त्यांनी केले आहे· मात्र सध्याच्या व्याकरणातील "मिश्र वाक्य" हा वाक्याचा तिसरा प्रकार पंचवार्तिकात सांगितलेला नाही· खण्डान्वय

व दंडान्वय असे वाक्ययोजनेचे दोन प्रकार भीष्माचार्यांनी सांगितले. आज वाक्यपृथ्थकरणाची जी पध्दती आहे तिचेच हे मूळ स्वरूप होय. शिवाय दंडान्वयी योजना म्हणजे पदक्रमपध्दती दर्शविणारी ही पहिली योजना म्हणता येईल.

**पंचवार्तिकातील विभक्ती विचार :-**

पंचवार्तिकात प्रथमा ते सप्तमी अशा सात विभक्ती मानल्या आहेत. संबोधन ही स्वतंत्र विभक्ती पूर्वी मानलेली नव्हती. संबोधनाचा समावेश प्रथमा विभक्तीतच केला आहे. या ग्रंथात सांगितलेले काही विभक्तींचे प्रत्यय तत्कालीन भाषेनुसार आजच्यापेक्षा वेगळे असले तरी ज्या शब्दांना ते प्रत्यय लागतात त्यांचा उद्देश पूर्वीचा व आजचा एकच असल्याचे दिसते. म्हणजेच अर्थाच्या दृष्टीने पंचवार्तिकात सांगितलेले विभक्तिप्रत्यय व सध्याच्या व्याकरणातील विभक्तिप्रत्यय यांच्यात साम्य दिसते. विनाप्रत्यय सांगितलेली प्रथमा विभक्ती आजही विनाप्रत्यय मानली जाते. व्दितीया, तृतीया, चतुर्थी, पंचमी व सप्तमी या विभक्तीचे प्रत्यय आजच्यापेक्षा वेगळे असले तरी अर्थाच्या दृष्टीने ते आताच्या-सारखेच आहेत. कालप्रवाहाबरोबर भाषेत फरक पडल्यामुळे प्रत्ययांचे वेगळेपण आज दिसते. षष्ठी विभक्तीचे प्रत्यय मात्र पूर्वीचे व आजचे सारखेच आहेत.

पंचवार्तिकातील विभक्तीच्या रूपांवरून असे दिसते की, प्रथमेची रूपे उकारान्त व ओकारान्त अशी आहेत. सध्याच्या व्दितीयेतील "स" आणि "ला" या प्रत्ययांचा अभाव आहे. तसेच व्दितियेत "ना" या प्रत्ययाऐवजी "आँ" प्रत्यय वापरला जात होता. आजच्या तृतीयेतील "ने" ऐवजी "एं करौनि" हा प्रत्यय तर चतुर्थी विभक्तीत सध्याच्या "स" ऐवजी "सि" हा प्रत्यय येत होता. सध्या पंचमी विभक्तीत जो "हून" हा प्रत्यय आहे त्याऐवजी पंचवार्तिकात "हुनि अगर होनि" असा प्रत्यय आढळतो. पंचवार्तिकातील हे विभक्तीचे विवेचन नंतरच्या मराठी व्याकरणकारांना मार्गदर्शक ठरले असले पाहिजे.

**पंचवार्तिक आणि शब्दांच्या जाती :-** शब्दांच्या जातींचा स्पष्टपणे उल्लेख पंचवार्तिकात केलेला नसला तरी ग्रंथात जाता जाता काही ठिकाणी त्यांचा उल्लेख आलेला आहे. शब्दांच्या आठ जातींचा प्रयोग आजच्याप्रमाणेच पूर्वीही केला जात होता. "जन्मु, त्यागु, परमेश्वरू, संबंधु" अशी उकारान्त व "निर्णयो, संशयो" अशी योकारान्त नामांची रूपे पंचवार्तिकात आहेत. तसेच "कव्हणी, इया, मिया, जेणे, जेआचे, तिथेची" अशी सर्वनामाची रूपे

दिसून येतात· "अनंतशक्ती, विद्यावान, वोखटे, सच्चिदानंदस्वरूप अशी विशेषणांची रूपे योजिली जात होती तर काही संख्यांचाही उपयोग आजच्या संख्यावाचक विशेषणासारखा केलेला आहे·

सूत्रलक्षण सांगताना भीष्माचार्यांनी पदांचे सलिंग, अलिंग व क्रिया असे तीन भेद केलेले आहेत· वाक्याला पूर्णत्व आणण्यासाठी क्रियापदाची आवश्यकता असते· वर्तमानकाळ, भूतकाळ व भविष्यकाळ हे क्रियापदाचे मुख्य तीन काळ आजच्यासारखेच पंचवार्तिकात सांगितले आहेत· तसेच एकवचन, व्दिवचन व बहुवचन अशी क्रियेची तीन वचने आणि प्रथमपुरूष, मध्यमपुरूष व उत्तमपुरूष हे तीन पुरुष मानले आहेत· क्रियेचे व्दिवचन आज मानले जात नाही· क्रियापदाचे क्वचित कर्तरि, क्वचित कर्मणि व क्वचित भावे असे तीन प्रयोग सांगून त्यांच्या ज्या व्याख्या व उदाहरणे पंचवार्तिकात दिलेली आहेत· हे तिन्ही प्रयोग आजही मानले जातात· "होआवा, भणितले, आति, जानिजेति, दिधले, बोलिजेति" इ·क्रियापदांच्या रूपांबरोबरच "कीजे, जानिजे अशी आज्ञार्थी क्रियापदेही योजिण्यात येत होती· पंचवार्तिकाची भाषा प्राचीन असल्यामुळे क्रियापदांची तत्कालीन रूपे आजच्यापेक्षा वेगळी वाटतात पण अर्थाच्या दृष्टीने त्यात सारखेपणाच दिसतो· क्रियापदांचे सकर्मक व अकर्मक असे दोन भेद भीष्माचार्यांनी सांगितले आहेत· याशिवाय इतर प्रकारांचा उल्लेख मात्र पंचवार्तिकात नाही·

**<u>पंचवार्तिकातील अव्यय विचार</u> :-**

पंचवार्तिकात अव्ययांचा उल्लेख स्पष्टपणे आलेला नसला तरी चारीही अव्ययांची रूपे पुढीलप्रमाणे आढळतात· "यथाशक्ति, सार्थकाचे, अधीन" अशी क्रियाविशेषणाची रूपे दिसतात· तर "ते, भणौनि, का, आन्, जरि, परि, तरि, मग, के, की" अशी रूपे उभयान्वयी अव्ययाची दिसतात· "पासौनि, मध्ये, कडे, माजी, कारणे, स्तव, सारिखा, व्यतिरिक्त, वाचौनि, नुसार" अशी शब्दयोगी अव्ययांची रूपे पंचवार्तिक ग्रंथात आलेली आहेत· तर केवलप्रयोगी अव्ययाची "की गा, हा गा, अगा, देमति" अशी रूपे आढळतात· पंचवार्तिकातील ही रूपे व सध्याची मराठी व्याकरणातील अव्ययांची रूपे यांच्यात साम्य दिसून येते·

**<u>पंचवार्तिकातील शब्दविचार</u> :-**

भाषेत असे काही शब्द असतात की ते मुळात जसे आहेत तसे भाषेत उपयोजित असताना वापरले जात नाहीत· काही शब्द दुस-या शब्दांच्या साहयाने तयार होतात·

यांनाच साधित शब्द म्हणतात· साधित शब्दांचे कृदन्त, तध्दित, सामासिक व अभ्यस्त असे चार प्रकार पडतात· हे चार प्रकार सध्याच्या मराठी व्याकरणात सांगितले आहेत· पंचवार्तिकातही हे चारही प्रकार दिसतात, परंतु कृदन्त, तध्दित व सामासिक अशा तीन प्रकारांचे निरूपण भीष्माचार्यांनी केले आहे· अभ्यस्त हा चौथा प्रकार त्यांनी सांगितलेला नाही·

धातूंना प्रत्यय लागून त्यापासून तयार होणारे शब्द म्हणजे कृदन्त शब्द किंवा धातुसाधिते होत· उदा·"रक्षक, त्यागु, पावन, वेदना, रचित, मुक्ति, दाता" अशी कृदन्ती रूपे "अ, अक, अन, अना, ता, ति" अशा प्रत्ययापासून होतात· नामाला प्रत्यय लागून तध्दित शब्द होतात· उदा·"ता, त्व, य, आलु, मान, तर" असे प्रत्यय लागून "देवता, देवत्व, सौभाग्य, दयालु, बुध्दिमान, शुभतर" अशी तध्दित शब्दांची होणारी रूपे पंचवार्तिकात सांगितली आहेत·

धातूशिवाय इतर सर्व प्रकारच्या शब्दांना मागे किंवा पुढे प्रत्यय लागून तध्दित शब्दांची रूपे होतात· हे स्पष्टीकरण भीष्माचार्यांनी केलेले नाही· तसेच उपसर्गघटित शब्दांचा उल्लेख पंचवार्तिक ग्रंथात नाही· मात्र विवेचनाच्या ओघात "सलिंग, अयोग्य, उपसंहार, पूर्वपद, उत्तरपद" असे उपसर्गघटित शब्द आलेले आहेत· शब्दघटनेतील सामासिक शब्दांचा सविस्तर विचार भीष्माचार्यांनी केला आहे· पण "अभ्यस्त" हा चौथा प्रकार त्यांनी सांगितलेला नाही· मात्र पंचवार्तिकाच्या लिखाणात "पचनपाचन, एकुएकु, भिन्न भिन्न, गावा गावा" असे अभ्यस्त शब्द आलेले आहेत·

**पंचवार्तिकातील शब्दरूप विचार :-**

विशिष्ट कालखंडात एखाद्या भाषेची वर्ण वापरण्याची एक विशिष्ट पध्दत असते· पंचवार्तिककालीन मराठी वाङ्मयात वर्ण वापरात आजच्यापेक्षा काही वेगळेपण दिसते·

| पंचवार्तिककालीन मराठी शब्दांचे रूपे | आजच्या मराठी शब्दांची रूपे· |
|---|---|
| ॐखटा | वोखटा किंवा ओखटा |
| आईके | ऐके |
| तेयाते | त्याते |
| भणौनि | म्हणून |

| | |
|---|---|
| करौनि | करून |
| इये | या |
| जेआ | ज्या |
| भीतरीचिआ | भीतरीच्या |
| पडलिआ | पडल्या |
| अवघेआ | अवघ्या |
| शब्दाचे आ | शब्दाच्या |
| सूत्रांचिआ | सूत्रांच्या |

**पंचवार्तिक लेखनातील "अल्पाक्षर" प्रवृत्ती :-**

कमीत कमी श्रमात जास्तीत जास्त काम करण्याकडे माणसाचा कल असतो. वेळेच्या व श्रमाच्या बचतीसाठी त्याची ही प्रवृत्ती असते. भाषेचा वापर करतानाही त्याची ही प्रवृत्ती दिसून येते. यालाच शब्दसौकर्य किंवा वर्णसौकर्य असे म्हणतात. भाषेतील सामासिक शब्द याचीच परिणती म्हणता येईल. पंचवार्तिकात सामासिक शब्दांशिवाय इतरही काही ठिकाणी अशी सौकर्याची उदाहरणे आढळतात. उदा."स्वीकार करून" असे म्हणण्याऐवजी "स्वीकारौनि", "सांगत आहे" याऐवजी "सांगिजताए" तसेच "जीतेनि, नुमटे, अनुक्तार्थ" या शब्दांत वर्णांची बचत केलेली दिसते. तसेच व्याख्यास्वरूपी विवेचन करून "अल्पाक्षरत्व" साधले आहे.

**पंचवार्तिकातील सामान्यरूप :-**

शब्दाला प्रत्यय लागताना काही शब्दांच्या शेवटच्या अक्षरात काही बदल होतो तर काही शब्दांच्या अक्षरात बदल न होताही प्रत्यय लागतो. शब्दाला प्रत्यय लागताना शब्दातील शेवटच्या अक्षराला जो विकार होतो त्यालाच सामान्यरूप म्हणतात. पंचवार्तिकात "सभेआतु, चौघांचिया" अशी काही सामान्यरूपाची उदाहरणे सध्याच्या मराठीतील रूपांपेक्षा वेगळी आहेत. मात्र "कर्तृत्वाकडे, पुरूषांची, क्रियापदांचे, दिवसानंतर, कर्मानुसार ही रूपे आताच्या सामान्यरूपासारखीच आहेत.

**पंचवार्तिकातील वाक्प्रचार व म्हणी :-**

एखाद्या भाषेत म्हणी, वाक्प्रचार, जोडशब्द इ.किती प्रमाणात व कसे वापरले जातात यावरून त्या भाषेची समृध्दता कळते. पं.भीष्माचार्यांनी पंचवार्तिक लिहिले त्या

काळातील मराठी भाषा समृध्द असल्याचे पंचवार्तिकाच्या लिखाणात दिसून येते. "पंचवार्तिक" हा व्याकरणग्रंथ असल्याने यात वर्णनात्मक भाग तसा कमीच आहे. तरीही व्याकरणविषयक लिखाणातून मराठी भाषेची समृध्दता दर्शविणारी काही वैशिष्टये दिसून येतात. "ज्ञान-दान करीति, प्रकाशित होति, वश होति, हिंसा करीति, अन्वय लाविजे, शुश्रूषा कीजे" असे वाक्प्रचार या ग्रंथात आलेले आहेत. तसेच "ज्ञाना पसि प्रेम उत्तम, राजसा पसि तामस उखटा, जेचि मान ब्रह्मांडी तेचि पिण्डी, पापाय फल दुख : पुण्याय फल सुख" अशा म्हणींचाही उल्लेख ग्रंथात आला आहे. भाषेची समृध्दता दर्शविणा-या या तत्कालीन वाक्प्रचार व म्हणी सध्याच्या मराठी भाषेतील वाक्प्रचार व म्हणींशी साम्य दर्शविणा-या आहेत.

**पंचवार्तिकातील छंदविचार :-**

भाषा अलंकारिक असल्यास तिला शोभा येते. व्याकरण या वाङ्मयप्रकारात अलंकारिक भाषेला कमी वाव असतो. त्यामुळे पंचवार्तिकात लेखनाच्या ओघात उपमा व दृष्टांत एवढेच अलंकार आणि तेही क्वचित आलेले आहेत. "हस्ती खांबासारिखा, हस्ती मुसळासारिखा, प्रपंच भणजे स्वतंत्र पदार्थु" अशी उपमा अलंकाराची उदाहरणे या ग्रंथात आली आहेत. तर "त्यागु जैसा खेई योईचा, वैराग्य जैसा भर्तृहरीचा, तळिचील हानितले आ वरचील पडे उतरूंडी गडबडी" असे दृष्टांताचेही उल्लेख आलेले आहेत. उदाहरण म्हणून एके ठिकाणी "हत्तीचा दृष्टांत" हा विस्तृत दृष्टांतही पंचवार्तिकात आला आहे.

**भाषेच्या अर्थपूर्णतेसाठी विरामचिन्हांचा वापर :-**

भाषा बोलताना अगर लिहिताना तिच्यात अर्थपूर्णता यावी तसेच बोललेले ऐकणाराला व लिहिलेले वाचणाराला कळण्यासाठी विरामचिन्हांची आवश्यकता असते. विराम म्हणजे विश्रांती किंवा थांबणे. वाक्यात बोलणा-याचा किंवा लिहिणा-याचा उद्देश श्रोत्यापर्यंत किंवा वाचकापर्यंत पोहोचण्यासाठी भाषेत अशी विरामचिन्हे वापरावी लागतात. पंचवार्तिकात स्वल्पविराम ﴾,﴿, अपूर्णविराम ﴾:﴿, प्रश्नचिन्ह ﴾?﴿, अपसारण चिन्ह ﴾-﴿, संयोगचिन्ह ﴾- उदा. विरोध-कल्पना﴿, कंस ﴾ ﴿, ही विरामचिन्हे योजिलेली आहेत. याशिवाय एकेरी ﴾' '﴿ व दुहेरी ﴾" "﴿, अशी दोन्ही प्रकारची अवतरणचिन्हे आणि ﴾:, .﴿ असे दोन प्रकारचे पूर्णविराम योजिलेले आहेत. पं. भीष्माचार्यांनी त्यांच्या

ग्रंथात योजिलेली ही विरामचिन्हे आजच्या मराठी भाषेत वापरली जातात. फक्त पूर्वी वापरात असलेला ॥:॥ हा पूर्णविराम आज उपयोगात आणला जाता नाही.

**पंचवार्तिकाचे इतर काही विशेष :-**

पंचवार्तिकात आलेली यादवकालीन क्रियापदांची व अव्ययांची रूपे आजच्या मराठी भाषेतील रूपांशी बरीच जुळतात. प्रयोगविचार, विभक्तिविचार, प्रत्यय तसेच पुरूष, लिंग, संधी व समास आजच्या मराठी भाषेच्या व्याकरणातील संकल्पनांशी जवळीक साधणा-या वाटतात. याशिवाय आणखी काही विशेष पंचवार्तिकात आढळतात.

.१. आजच्या शुध्दलेखनाच्या नियमापेक्षा पंचवार्तिकातील लेखन काही बाबतीत वेगळे आहे. शब्दाच्या अंत्याक्षराचे "इ-कार व उ-कार" दीर्घ लिहावेत असा नियम सध्या असून काही अपवाद वगळता या नियमानुसार लेखन केले जाते. पण पंचवार्तिक ग्रंथात इ-कारान्त व उ-कारान्त शब्द -हस्व लिहिण्याकडे अधिक कल दिसतो. शिवाय उ-कारान्त शब्दांचे प्रमाण अधिक दिसते. उदा.होतातित, जीतेनि, करौनि, प्रीति, त्यागु, विभागु, एकु इ. .२. "म्हणावे, करावे, जाणावे, उपयोजावे, बोलावे" अशा आजच्या मराठीतील रूपांऐवजी "भणिजे" करिजे, जाणिजे, उपयोजिजे, बोलिजे" अशी रूपे पंचवार्तिक ग्रंथात आहेत. .३. पंचवार्तिकातील भाषेचा कल सामासिक स्वरूपाकडे अधिक वाटतो. उदा. "यथोचित, सर्व शक्तिमान, त्रिभुवन, पीतांबरी, अनंतशक्ती इ." यावरून वर्तमान मराठीच्या सामासिक स्वरूपाची बीजे पंचवार्तिककालीन मराठी भाषेत स्पष्ट दिसतात.

शब्दांचा रूपविचार व वाक्यविचार त्या भाषेचे व्याकरण करीत असते. वाक्यातील घटकांचे परस्परसंबंध शोधणे व व्याकरणदृष्टया बिनचूक वाक्याचे नियम तयार करण्याचे काम व्याकरणकाराला करावे लागते. पंचवार्तिकात पं.भीष्माचार्यांनी या संकल्पनांचे विवेचन केले आहे. आपण वाक्य कशी वापरतो हे समजून घेण्यासाठी भाषाशास्त्रज्ञ व्याकरणाचा अभ्यास करतो. "पंचवार्तिक" ग्रंथाचा या दृष्टीने भीष्माचार्यानंतरच्या भाषाशास्त्रज्ञांना व व्याकरणकारांना उपयोग झाला असला पाहिजे.

**पंचवार्तिकावरील टीका :-**

"पंचवार्तिक" हा मराठी भाषेतील व्याकरणलेखनाचा पहिला-वहिला प्रयत्न मानला जातो. तरीही या ग्रंथाबाबत टीकेचा सूर दिसून येतो. पंचवार्तिकातील सूत्रलक्षण पाणिनीच्या व्याकरणातीलच आहे. व्याकरणाचा जो काही किरकोळ भाग पंचवार्तिकात

आला आहे, तो मराठीच्या व्याकरणाचा नसून सूत्रांचे सपष्टीकरण करण्यापुरते आवश्यक ते व्याकरणज्ञान संस्कृत व्याकरणाच्या आधारे त्यांनी मांडले आहे· त्यामुळे पंचवार्तिक हे मराठीचे पहिले व्याकरण व भीष्माचार्य हा पहिला व्याकरणकार इत्यादी भाबडया कल्पना आता सोडून दिल्या पाहिजेत· "व्याकरण" म्हणून ते जसे महत्त्वाचे नाही, तसेच "वार्तिक" या दृष्टीनेही त्याच्यात विशेष काही आढळत नाही·[९]

संस्कृत व्याकरणाच्या आधारे लिहिलेले मराठी व्याकरण अशी टीका केलेली असली तरी भीष्माचार्यांनी संस्कृत व्याकरणाचा केवळ आधारच घेतला आहे· मराठी ही वेगळी भाषा असून त्या भाषेतील शब्दघटना, शब्दांची रूपे, वाक्यविचार यांचे विवेचन भीष्माचार्यांनी केले आहे· सूत्रांच्या अर्थस्पष्टीकरणासाठी असो अथवा अन्य उद्देशासाठी, मराठी व्याकरण लिहिण्याचे कार्य त्यांच्या हातून घडले आहे· मराठी व्याकरणाचा किरकोळ भाग पंचवार्तिकात आला असून हे सविस्तर व्याकरण नाही· त्यामुळे व्याकरणग्रंथ म्हणून तो महत्त्वाचा नसल्याचे टीकाकार म्हणतात· परंतु व्याकरणाचा किरकोळ भाग का होईना पंचवार्तिकात आला आहे· याची कबुली खुद्द टीकाकारांनीच दिली आहे· त्यामुळे व्याकरणदृष्टया पंचवार्तिकाचे अजिबातच महत्त्व नाही असे म्हणता येणार नाही·

तसेच "वार्तिक" म्हणून शब्दांचा सर्व प्रकारचा सविस्तर विचार पंचवार्तिकात कदाचित आला नसेल· म्हणून त्याला "वार्तिक" न म्हणण्याइतपत तो ग्रंथ टाकाऊ आहे असेही म्हणणे चुकीचे होईल· "पंचवार्तिक" लिहिणारा व "बत्तीस लक्षणांची टीप" लिहिणारा भीष्माचार्य हे जर एकच मानले[१०] तर मात्र बत्तीस लक्षणांची फोड करताना "लक्षणवार्तिक" यांनी सिध्द केले आहे· या भाष्यग्रंथात त्यांनी पंचवार्तिकाचा उल्लेख केलेला आहे· या टीपग्रंथात बत्तीस लक्षणांच्या त्याने मराठीत केलेल्या व्याख्या भाषेची प्रौढी व प्रतिष्ठा दर्शवितात·[११] पंचवार्तिकाच्या या जमेच्या बाजू पाहता, या ग्रंथाने मराठी साहित्यात भरच घातली· मराठी साहित्याचे काही नुकसान तर केले नाही असे म्हणावे लागेल·

**पंचवार्तिकाचा गद्यलेखनावर प्रभाव :-**

इ·स·१३५० च्या सुमारास महानुभाव वाङ्मयातील भाष्यग्रंथाच्या निर्मितीला अनुकूल अशा घटना घडत गेल्या· तेराव्या-चौदाव्या शतकात महाराष्ट्र सरस्वतीने मराठी भाषेतील गद्य वाङ्मयाचे व्यासपीठ सुसज्ज केले·[१२] विद्यार्थ्यांना व मराठी भाषेच्या भक्तांना

उपयोगी पडतील असे ग्रंथ लिहिण्यास सुरुवात झाली.[१३] पंचवार्तिकासारखे ग्रंथ याच काळात निर्माण झाले. त्यामुळे पंचवार्तिकासारख्या व्याकरणग्रंथाचा प्रभाव तत्कालीन महानुभावीय गद्यलेखनावर पडला असणार हे साहजिक आहे. कारण महानुभाव गद्यातील दीर्घ वाक्ये "संयुक्त" असतात तर गौण वाक्ये अल्पपदी म्हणजे "केवल" असतात. प्राचीन मराठी गद्याची भरीव वाढ व तितकेच भरीव व समृध्द असे निर्माण झालेले तत्कालीन व्याकरण यावरून गद्याच्या समृध्दीची कल्पना येते आणि विकासाची दिशाही स्पष्ट होते.[१४]

**पंचवार्तिक : "आद्य मराठी व्याकरण" :-**

पं. भीष्माचार्यांनी पंचवार्तिक लिहिण्यापूर्वी कवीश्वर व्यास व आनेराज व्यास यांनी व्याकरणलेखनाचे प्रयत्न केले होते. त्यापैकी कवीश्वर व्यास यांचा व्याकरणग्रंथ अनुपलब्ध असून आनेराज बासांनी केवळ लक्षणविचार करून मर्यादित स्वरूपात व्याकरण लिहिण्याचा प्रयत्न केला. म्हणून पं. भीष्माचार्यांनी रचलेले "पंचवार्तिक" हे आद्य मराठी व्याकरण म्हणून उल्लेखनीय आहे.[१५] मराठी व्याकरणाचा विचार करताना महानुभावांच्या काळापासून म्हणजेच पं. भीष्माचार्यांच्या पंचवार्तिकापासून मराठी व्याकरणाचा प्रारंभ करावा लागतो.[१६] पं. भीष्माचार्यांचा पंचवार्तिक लिहिण्याचा उद्देश श्री चक्रधरोक्त सूत्रांचे निर्वचन करणे असा असला तरी मराठी भाषेतील व्याकरणविषयक चर्चा करणारा पहिला ग्रंथ "पंचवार्तिक" होय.[१७] भीष्माचार्यांनी "पंचवार्तिक" नावाचा व्याकरणावर ग्रंथ लिहिला आहे.... अशा पध्दतीने रचलेले हे मराठी मायबोलीतील पहिले-वहिले व्याकरण होय.[१८] मराठी भाषेचे शास्त्रीय संपूर्ण व्याकरण पंचवार्तिकात आलेले नसल्याने मर्यादित स्वरूपातील व्याकरण ही उणीव जरी त्याची असली तरी वरील मते पाहता, महानुभावी ग्रंथकारांनी व्याकरणशास्त्रा-वर विचार केला होता हे स्पष्ट होते.[१९] म्हणून पंचवार्तिकाला मराठी भाषेतील "आद्य व्याकरणग्रंथ" म्हणावयास हरकत नसावी.

पंचवार्तिक लिहिले तेव्हाचा काळ मराठी वाङ्मयाच्या दृष्टीने समृध्दीचा काळ होता. मराठीतील वाङ्मयनिर्मितीचा हा प्रारंभिक काल असला तरी प्रौढता व परिपक्वतेच्या दृष्टीने तो समृध्द आहे. कोणत्या का उद्देशाने होईना विविध वाङ्मयप्रकारांची मौल्यवान लेणी त्या काळात महानुभावीय साहित्यिकांनी मराठी शारदेला अर्पण केली आहेत.[२०] यादवांच्या काळात पंचवार्तिक लिहिले गेले असल्याने तत्कालीन भाषा व बोलीची वैशिष्टये त्यात दिसून येतात. ज्या काळात महाराष्ट्रात चोहीकडे संस्कृत भाषेचा प्रभाव

प्रभाव होता, अशा वेळी या पंथातील साहित्यिकांनी मराठी भाषेतून वाङ्मयनिर्मिती केली यातून त्यांची समाजनिष्ठाच दिसून येते· मराठी भाषेविषयीचा त्यांचा अभिमान यातून व्यक्त होतो· वास्तविक ज्या काळातील साहित्यिकांचा उद्देश साहित्यनिर्मिती करण्याचा नव्हता तर पंथप्रसार करण्याचा होता· तरीही शास्त्रीय वाङ्मयाचा कस त्यांच्या साहित्यात निर्माण झाला· ही मराठी साहित्यक्षेत्राला मिळालेली फार मोठी देणगी होय·

**पंचवार्तिक व आजचे मराठी व्याकरण :-**

आजच्या मराठी व्याकरणातील ब-याच संकल्पनांचे विवेचन भीष्माचार्यांनी केले आहे· ते सध्याच्या व्याकरणाशी जवळीक साधणारे असे आहे· त्यांचे हे निरूपण प्रामुख्याने व्याख्यास्वरूपी असल्याने "अल्पाक्षरत्व" या वैशिष्टयांनी युक्त आहे· उदा·"सा वचनांचे सूत्र ते वाक्य बोलिजे" संस्कृत व्याकरणाचा प्रभाव पंचवार्तिकावर असला तरी हे मराठी भाषेचे व्याकरण आहे· हे लक्षात घेण्यासारखे आहे· "वचनवाक्या"ची संकल्पना ही भीष्माचार्यांनी स्वतंत्रपणे मांडली आहे· "महावाक्य" व "प्रकरण" यांच्या स्वतंत्र व्याख्या तसेच "केवल वाक्य" आणि "संयुक्त वाक्य" या वाक्यप्रकारांच्याही स्वतंत्र व्याख्या त्यांनी केल्या आहेत· वचनवत्प्रयोग, वाक्यवत्प्रयोग व वचनवाक्यवत्प्रयोग अशा तीन प्रकारांनी संयुक्त वाक्याचे वर्गीकरण भीष्माचार्यांनी केले· तसेच खंडान्वय व दंडान्वय असे वाक्ययोजनेचे दोन प्रकार करून जी वाक्यपृथ्थकरणाची पध्दती त्यांनी सांगितली ती आजच्या पृथ्थकरणपध्दतीचा पायाच म्हणावा लागेल· वाक्यपृथ्थकरण व वाक्यवर्गीकरण यांची पहिली मुहूर्तमेढ भीष्माचार्यांनी रोवली हे यावरून स्पष्ट होते·[२१] पंचवार्तिकातील व तत्कालीन इतर ग्रंथातील भाषेचा कल सामासिक स्वरूपाकडे दिसतो· यातून वर्तमान मराठीच्या सामासिक स्वरूपाची बीजे पंचवार्तिक कालीन मराठी भाषेत दिसतात· पंचवार्तिका-सारख्या व्याकरणग्रंथाचा प्रभाव तत्कालीन गद्यलेखनावर असल्याने त्या काळात गद्याच्या समृध्दीची आणि विकासाची दिशा या ग्रंथाने दिली. म्हणून मराठी वाङ्मयाला ब-याच बाबतीत उपकृत ठरणारा "पंचवार्तिक" हा व्याकरणग्रंथ "मराठीतील आद्य व्याकरण" मानल्यास संयुक्तिक होईल·

## :::::: संदर्भ ::::::


१. सुहासिनी इर्लेकर, **यादवकालीन मराठी काव्यसमीक्षा**, औरंगाबाद,१९७९ , प्रास्ता·, पृ·१.

२. वि·ल·भावे, **महाराष्ट्र सारस्वत**, आ·५ वी, मुंबई,१९६३ , पृ· २६.

३. उषा मा·देशमुख, **साहित्यमुद्रा**, मुंबई,१९९०, पृ· २२.

४. अ·ना·देशपांडे, **प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास**, भाग दुसरा, पृणे, १९७३ , पृ· ३३०.

५. उषा· मा· देशमुख, उ·नि·, पृ·२५.

६. तत्रैव, पृ· २६.

७. द·के·केळकर, **मराठी साहित्याचे सिंहावलोकन**, पुणे,१९६३ , पृ· ५८.

८. ग·ह·केळकर, **मराठी व्याकरणाची मूलतत्वे**, शं·गो·तुळपुळे §संपा·§, आ· ५वी, पुणे, १९७६ , पृ· १९५.

९. भीमराव कुलकर्णी, "महानुभावीय वाङ्मय", **मराठी वाङ्मयाचा इतिहास**, स·ग·मालशे §संपा·§, खंड दुसरा, भाग पहिला, पुणे १९८२ , पृ· ५११.

१०. अ·ना·देशपांडे, **प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास**, भाग पहिला, पूर्वार्ध, पुणे, १९६६ , पृ·४९७.

११. भीमराव कुलकर्णी, उ·नि·, पृ· ५१२.

१२. द·के·केळकर, उ·नि·, पृ· ३९.

१३. वि·ल·भावे, उ·नि·, पृ· १८१.

१४. उषा मा· देशमुख, उ·नि·, पृ· ४७.

१५. अ·ना·देशपांडे, **प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास**, भाग पहिला, उ·नि·, पृ· ४९७.

१६. गं·ना·जोगळेकर, "मराठी भाषेच्या अभ्यासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा", **महाराष्ट्रातील साहित्य पत्रिका**, वि·स·वाळिंबे §संपा·§, अंक २६६ ,§जुलै-सप्टेंबर१९९३ §, पुणे, पृ·६६.

१७. व·दा·कुलकर्णी, "पंचवार्तिक", **महानुभाव**, महन्त श्री नागराजबाबा महानुभाव §संपा·§, वर्ष ३१ वे, अंक १ व २, औरंगाबाद, §एप्रिल-मे १९९१ §, पृ· २१.

१८. द·के·केळकर, उ·नि·, पृ· ५८ । ५९.

१९. य·रा·दाते व चिं·ग·कर्वे (संपा·), **महाराष्ट्र शब्दकोश**, विभाग सहावा, न·आ; पुणे, १९८८, प्रस्ता·, पृ· २.

२०. अ·ना·देशपांडे, **प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास**, भाग पहिला, उ·नि·, पृ· ५०४.

२१. उषा मा· देशमुख, उ·नि·, पृ· ४६.